## प्रेस नोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती
दिनांक : ०१.०६.२०२३

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | श्री.गौरव सुरेश लांजेवार, वय ३३ वर्षे, पद– तलाठी, साजा मोर्शी ता.मोर्शी जि.अमरावती, मुळ पत्ता – रा.मुदलियार नगर,गल्ली न. १ कल्याण नगर जवळ,अमरावती, वर्ग – ३. |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | ०१/०६/२०२३ चे १२/३६ ते १२/५८ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | ३०००/– रुपये तडजोडीअंती २५००/– रूपये |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | २५००/– रुपये (पडताळणी वेळी ५००/– रु. व सापळा कार्यवाही दरम्यान २०००/– रु.) |
| ६ | घटनास्थळ | सत्यसाईबाबा उपहार गृह, सम्राट बारच्या खाली, तहसिल कार्यालयाजवळ, मोर्शी |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार हे समर्थ कॉलनी मोर्शी येथील रहिवासी असुन त्यांचे घराचे क्षेत्रफळ हे सातबा–यावर चुकीचे दर्शविण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर क्षेत्रफळाची सातबा–यावर दुरुस्ती होवून नवीन ऑनलाईन सातबारा मिळणेकामी तक्रारदार यांनी तहसिल कार्यालय मोर्शी येथे अर्ज केला होता. त्यावरुन साजा मोर्शी येथील तलाठी श्री. गौरव सुरेश लांजेवार यांनी सदर क्षेत्रफळाची सातबा–यावर दुरुस्ती होवून नवीन ऑनलाईन सातबारा देण्यासाठी ३०००/– रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक ०१/०६/२०२३ रोजी सविस्तर तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दि.०१/०६/२०२३ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान श्री. गौरव सुरेश लांजेवार तलाठी सांजा मोर्शी यांनी तक्रारदार यांना त्यांचा दुरुस्त केलेला सातबा–याची प्रत देवून केलेल्या कामाचा मोबदला म्हणून तडजोडीअंती २५००/– रूपये लाचेची मागणी करून पडताळणी कार्यवाही वेळी ५०० रु. स्विकारले व उर्वरीत २०००/– रु. नंतर स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लगेच आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष तलाठी श्री.गौरव सुरेश लांजेवार यांनी स्वतः करीता उर्वरीत २०००/– रु. लाच रक्कम स्विकारली. वरून वरील नमुद आरोपी यांनी पडताळणी वेळी ५००/–रु. व सापळा कार्यवाही दरम्यान २०००/–रु. असे एकुण २५००/–रु. लाच रकमेसह ताब्यात घेण्यात आले आहे. नमुद आरोपींविरुध्द पो.स्टे. मोर्शी, अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती, श्री.शिवलाल भगत, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.अमोल कडु, पो.नि.योगेशकुमार दंदे, पो.कॉ. शैलेश कडु, पो.कॉ.आशिष जांभोळे, पो.कॉ.उमेश भोपते, पो.कॉ.उपेंद्र थोरात व चालक पोहवा श्री. चंद्रकांत जनबंधु यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क : अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती**
**ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५, मो.न.७०२०६९३४८१**
**टोल फ्रि नंबर – १०६४**

(अमोल कडु)
पोलीस निरीक्षक
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
**मो.न.८०८७०७२९१९**